# आरती श्री शनी देवाची

जय देव जय देव जय शनी देवा
आरती ओवाळितो तुज ग्रहश्रेष्ठा
जय देव जय देव ॥धृ.॥

निळी काळी कभिन्न कांती तेजस्वी तरी
गृध्रवाहन हाती बाण त्रिशूल धरी
भजता भक्तांवरी कृपा छायासुत करी
दुष्टनिर्दालन करी रक्षीसी निजभक्ता
आरती ओवाळितो तुज ग्रहश्रेष्ठा
जय देव जय देव ॥१॥

रूष्ट पित्यावर अर्कपुत्र पश्चिमाभिमुख
वारिता मातेवरील अन्याय होसी सन्मुख
संपता साडेसाती देसी सर्वजनांना सुख
द्वादश राशीपती तू शिवप्रिय शनीराजा
आरती ओवाळितो तुज ग्रहश्रेष्ठा
जय देव जय देव ॥२॥

- नारायण
शनी जयंती, शके १९४२
(०५/२२/२०)